# तहसीलदार खोमणे,पो.नि.बांगर,सपोनि पाटील यांच्या भ्रष्ट कारभाराचा बुरखा स्थानिक गुन्हे शाखेने टराटरा फाडला

# अवैध वाळुचा २३लाखाचा मुद्देमाल जप्त केला

## जिल्हाधिकारी साहेब,संदीप खोमणेवर कारवाई करा,पोलिस अधिक्षक साहेब, संदीप पाटील, पो.नि.बांगरला जाब विचारा



बीड (सरकार): गेवराई तालुक्यात अवैध वाळूचा धंदा जोमात सुरू आहे. मात्र तहसीलदारसह गेवराई पोलीस स्टेशनचे पो.नि. व चकलांबाचे सपोनि यांनी जाणून बुजून जिल्हाधिकाऱ्यांसह पोलीस अधिक्षकांची दिशाभूल करून अवैध वाळू उत्खनन व वाहतूक होत नसल्याचे वारंवारं सांगितले. मात्र या तीन अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट कारभाराचा बुरखा स्थानिक गुन्हे शाखेने सिंघम कारवाई करत टराटरा फाडला. २३ लाखाचा मुद्देमाल जप्त करून दोन्ही पोलीस अधिकाऱ्यांचे वाळू माफियांना मिळत असलेले आशीर्वाद दाखवून दिले आहेत.



त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांस, पोलीस अधिक्षकांनी या तिन्ही अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी अशी चर्चा होत आहे.

गेवराई तालुक्यात अवैध वाळूचा धंदा जोमात सुरू आहे. मात्र तहसीलदारसह गेवराई पोलीस स्टेशनचे पो.नि. व चकलांबाचे सपोनि यांनी जाणून बुजून जिल्हाधिकाऱ्यांसह पोलीस अधिक्षकांची दिशाभूल करून अवैध वाळू उत्खनन व वाहतूक होत नसल्याचे वारंवारं सांगितले. मात्र या तीन अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट कारभाराचा बुरखा स्थानिक गुन्हे शाखेने सिंघम कारवाई करत टराटरा फाडला. आज दि २३ जुलै २५ रोजी पहाटे साडेचार वाजेच्या सुमारास गेवराई पोलीस स्टेशन हद्दीमध्ये खामगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रात अवैध वाळू चोरटी उपसा ट्रॅक्टर व केणी च्या साह्याने करीत असल्याबाबत गोपनीय माहिती मिळाल्याने पथकाने जाऊन रेड केली असता अंधाराचा फायदा घेऊन तेथील इसम पळून गेले त्यामध्ये एक जागीच पकडला. एकूण चार ट्रॅक्टर व केन्या ताब्यातील आरोपीकडून जप्त केल्या. असा एकूण २३,००,०००/- ( तेवीस लाख रुपये )किमतीचा मुद्दाम तपासणी जप्त करून चार आरोपी विरुद्ध गेवराई पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे व एक आरोपी मुद्देमाल सह पोलीस स्टेशन येथे हजर केला आहे. सदरची कार्यवाही पोउपनि/सिध्देश्वर मुरकुटे व टीम यांनी केलेली आहे.




सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■पाने : ४

# सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २८४ वा ■ बुधवार २३ जुलै २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक २४ जुलै २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 284 ■ Wednesday 23 Jully 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


# रमी खेळणाऱ्या कोकाटेंच्या कृषिखात्याची खांदेपालट होणार!

# मकरंद पाटलांकडे कृषिमंत्रीपद देण्यासाठी हालचाली सुरू

मुंबई (सरकार): विधानसभेत रमी खेळणारे माणिकराव कोकाटे यांच्याकडील कृषिमंत्री काढून घेण्याच्या हालचाली सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यांच्याकडील खाते हे मकरंद पाटलांकडे देणार असल्याची माहिती समोर येत आहे. मकरंद पाटील यांच्याकडे सध्या मदत आणि पुनर्वसन खातं असून ते खातं माणिकराव कोकाटे यांच्याकडे सोपवण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

विधानसभेत कामकाज सुरू असताना कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे मोबाईलवर रमी खेळताना दिसून आले होते. त्यावरून आपण यूट्यूबची जाहिरात स्किप करत होतो अशी सारवासारव कोकाटेंनी केली. परंतु त्यावरुन विरोधकांच्या हाती आयतेच कोलित मिळाले आणि सरकारवर टीका झाली.

माणिकराव कोकाटे यांनी काहीही सांगितले तरी सरकारसाठी ते भूषणावह नाही अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली होती. तसेच राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीही या प्रकरणी उघड नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर कोकाटे यांचे मंत्रिपद काढून घेण्याची चर्चा सुरू झाली. परंतु आपण काहीही चुकीचं केल नाही असं माणिकराव कोकाटे म्हणाले. माणिकराव कोकाटे यांच्या या प्रकरणामुळे महायुतीच्या नेत्यांमध्ये एक प्रकारची नाराजी असल्याची चर्चा आहे.



त्यामुळे अजित पवार आणि सुनील तटकरे हे काहीतरी मोठी निर्णय घेणार असल्याची माहिती आहे.अजित पवार, सुनील तटकरे आणि माणिकराव कोकाटे यांच्यामध्ये बुधवारी एक महत्त्वाची बैठक होणार होती. परंतु अजित पवारांचा मुंबई दौरा रद्द झाल्यामुळे ही बैठक पुढे ढकलण्यात आली आहे. मात्र, येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये या बाबतीत मोठा निर्णय होण्याची शक्यता असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

महायुतीत कृषिखाते हे अजितदादांच्या राष्ट्रवादीकडे आहे. पण माणिकराव कोकाटे यांच्याकडून सातत्याने चुकीची वक्तव्य होत असल्याने त्यावरुन मोठी टीका सहन करावी लागत आहे. त्यामुळेच कोकाटे यांच्याकडील कृषिखाते आता मकरंद पाटलांकडे देण्यासाठी हालचाली सुरू आहेत अशी माहिती सुत्रांनी दिली.

मकरंद पाटील हे साताऱ्यातील मंत्री असून त्यांच्याकडे सध्या मदत आणि पुनर्वसन खात्याची जबाबदारी आहे. मकरंद पाटील यांच्याकडे कृषिखाते देऊन त्यांच्याकडील खाते हे माणिकराव कोकाटे यांच्याकडे देण्यासाठी हालचाली सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे सध्यातरी माणिकराव कोकाटे यांचे मंत्रिपद जाणार नसून त्यात फक्त बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने गावठी कट्टा पकडला

बीड (सरकार)नवगन राजुरी ता.जि.बीड येथे बस स्थानक परिसरात गावठी कट्टा बाळगणाऱ्या व्यक्तीला स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार नवगण राजुरी येथील बसस्थानकाच्या परिसरात असलेल्या विना नावाचे टपरी मध्ये गुलाबी रंगाचे टि शर्ट व काळी जिन्स् पॅन्ट् घातलेल्या इसमांनी त्याचे पॅन्ट्च्या आतमध्ये एक गावठी कट्टा खवलेला आहे. अशी माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकला असता एक व्यक्ती गावठी कट्ट्यासह आढळून आला.

प्रदीप अशोक वखरे, वय २७ वर्ष, रा. माळी गल्ली, राजुरी (न) असे या व्यक्तीचे नाव असून



पोलिसांनी त्याचे अंगझडती घेतली असता पॅन्ट्च्या आतमध्ये एक गावठी कट्टा मॅगझीनसह मिळून आला. सदरील गावठी कट्टा त्याला गणेश श्रीराम बहीर रा. राजुरी (न) ता.जि बीड यांने दिल्याचे सांगीतले. दोन्ही आरोपीविरुदध् पोलीस ठाणे बीड ग्रामीण गु.र.नं २३७/२०२५ कलम ३/२५ शस्त्र अधिनियमाअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक नवनित काँवत,अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारुती कांबळे, विष्णु सानप, विकास राठोड, भागवत शेलार चालक अतुल हराळे यानी केली आहे.

## वाल्मिकचा मुलगा श्री अन् साथीदारांनी महादेव मुंडेंना क्रूरपणे संपवलं

### शवविच्छेदन अहवाल,विजयसिंह बांगरने सर्वच माहिती उघड केली

बीड (सरकार): परळीतील व्यापारी महादेव मुंडे हत्याप्रकरणी त्यांच्या पत्नीने तीव्र आंदोलन केल्यानंतर आणि मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर सरकारने याप्रकरणी एसआयटी नेमली आहे. बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनीही याप्रकरणी सरकारने एसआयटी नेमण्याची मागणी केली होती. दरम्यान, वाल्मिक कराडनेच महादेव मुंडेंची हत्या केल्याचा आरोप वाल्मिक कराडचा जुना सहकारी असलेल्या विजयसिंह बांगर यांनी यापूर्वी केला होता. आता पुन्हा एकदा बांगर यांनी बीडमध्ये पत्रकार परिषद घेत महादेव मुंडेंना कसं आणि कुठं मारलं याची इतंभू माहिती दिली. तसेच, वाल्मिक कराडसह त्याचा मुलगा श्री कराडही या हत्याप्रकरणात सहभागी असल्याचे त्यांनी सांगितले.

महादेव मुंडे हत्याप्रकरणात यश मिळत असून सरकार या घटनेची दखल



घेत आहे. महादेव मुंडे यांच्या शवविच्छेदनाचे रिपोर्ट माझ्या हाती आले आहेत. त्यानुसार, त्यांच्या शरीरावर १५ ते १६ खोलवर जखमा असून अमानुष मारहाण असल्याचे यात उघड होत आहे. महादेव मुंडे यांची हत्या झाली कधी? असा प्रश्न विचारला असता ते घरी जात असताना कराडचा मुलगा श्री आणि त्याच्या साथीदाराने रेकी केली आणि हत्या केली. मुंडेंचा जीव जागेवर गेला नाही, तर क्रूर हत्या करण्यात आली. त्यांच्या पायावर जखमा करण्यात आल्या. रेंगाळत असताना गालावर वार केला, नंतर अन्न नलिकेवर वार करण्यात आला. या सर्व जखमा खोलवर आहेत.

मी खोट बोलत नाही, या फोटोत ते स्पष्ट दिसत आहे. त्यांचा जीव थोडा राहिला होता, त्यावेळी मानेवर मार देण्यात आला. किमान २० मिनिटे मारहाण झाली, अशी माहिती विजयसिंह बांगर यांनी पत्रकार परिषदेत दिली. श्री कराड, गोट्या गित्ते आणि त्याच्या साथीदारांनी ही मारहाण केली. अमानुष मारहाण करत त्यांचे मास तोडून नेले. छोट्या फ्लॉट मधून इगो हर्ट झाला आणि मारहाण झाल्याचेही बांगर यांनी सांगितले. सरकारला विनंती आहे की, आरोपींना तत्काळ अटक करावी. वाल्मिक कराडच्या मुलाचा देखील यात समावेश आहे. याप्रकरणी ड्खढ नेमण्यात आली मात्र यात IPS अधिकारी नेमण्यात आला नाही. चांगले अधिकारी यात नेमले पाहिजे, अशी मागणीही बांगर यांनी केली आहे. तहसील कार्यालय परिसरात अज्ञात ठिकाणी त्यांचा मृतदेह टाकण्यात आला होता, परळी पोलिस देखील यात सहभागी असतील. हत्या होत असताना पोलिस हाटकत होते. त्यामुळे, याप्रकरणात मुंडे कुटुंबाला न्याय मिळाला नाही तर अराजकता पसरेल. म्हणून, २५ तारखेला रास्ता रोको आंदोलन केले जाणार आहे, अशी माहितीही बांगर यांनी दिली.

## सूरज चव्हाणची रात्री शरणागती ड्रामा; पहाटे जामीनही

लातूर (सरकार): लातूरमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) आणि अखिल भारतीय छावा संघटना यांच्यातील संघर्षाने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. छावा



संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांना मारहाण केल्याच्या प्रकरणात मुख्य आरोपी आणि राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांनी २० जुलै रोजी रात्री उशिरा लातूरच्या विवेकानंद पोलीस ठाण्यात गुपचूप शरणागती स्वीकारली. विशेष म्हणजे, पहाटेच्या सुमारास त्यांना जामीन देखील मंजूर झाला आहे. यामुळे शेतकरी संघटनेत संतापाची लाट उसळली आहे. पोलिसांनी कमालीची गुप्तता पाळल्याने आणि तातडीने जामीन मिळाल्याने या प्रकरणावर नवे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.

## राज्यात पुढील २४ तासांत मुसळधार पावसाचा इशारा

पुणे (सरकार): गेल्या दोन दिवसांपासून राज्यात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढला असताना आता राज्यात पुढील २४ तास महत्त्वाचे ठरणार आहेत. हवामान विभागाने राज्यभरात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला असून संपूर्ण कोकणासह पुणे, सातारा, कोल्हापूर घाटमाथ्यावर पावसाचे रेड अलर्ट देण्यात आले आहेत. मुंबईला उद्या पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आलाय. पुढील चार दिवस राज्यभरात पावसाचा जोर वाढणार असल्याचं खचऊ ने सांगितलंय.

राज्यात पावसाचं स्वरूप आणखी तीव्र होणार आहे. बंगालच्या उपसागरात पुढील २४ तासांत कमी दाबाचं क्षेत्र तयार होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रात विशेषतः कोकण किनारपट्टीपासून विदर्भापर्यंत जोरदार ते अतिजोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. गुरुवार, २४ जुलै २०२५ रेड अलर्ट: रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, मुंबई उपनगर, मुंबई शहर पुणे, सातारा, कोल्हापूर घाटमाथा ऑरेंज अलर्ट: ठाणे, पुणे, सातारा येलो अलर्ट: कोल्हापूर, सांगली, पालघर, नाशिक, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा



शुक्रवार, २५ जुलै २०२५ रेड अलर्ट: रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग ऑरेंज अलर्ट: ठाणे, मुंबई उपनगर, मुंबई शहर, नागपूर, भंडारा येलो अलर्ट: पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर शनिवार, २६ जुलै २०२५ ऑरेंज अलर्ट: रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, मुंबई उपनगर, मुंबई शहर, नाशिक, पालघर, गडचिरोली येलो अलर्ट: पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, नागपूर मुंबईत पावसाची तीव्रता वाढणार मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये आज (२३ जुलै) दिवसभर मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, उद्या म्हणजेच २४ जुलै रोजी पावसाची तीव्रता आणखी वाढणार आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. नागरिकांनी शक्यतो घरातच राहावे, सुरक्षिततेच्या दृष्टीने खबरदारी घेण्याचं आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## ग्राहक सेवा केंद्रातील कर्मचाऱ्याने हडपली सहा लाखांची रक्कम

अंबाजोगाई (सरकार): शहरातील एका ग्राहक सेवा केंद्रातून कामावर असलेल्या कर्मचाऱ्याने तब्बल ६ लाख ८ हजार ६०० रुपयांचा आर्थिक अपहार केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात त्या कर्मचाऱ्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शरद आश्रुबा चव्हाण रा. मोरेवाडी, ता.अंबाजोगाई (-ालरक्षेसरळ) यांचे यशराज ई-सर्व्हिसेस नावाचे ग्राहक सेवा केंद्र नगर परिषद इमारतीत कार्यरत आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, बँकिंग सेवा पुरवणाऱ्या या केंद्रात बँक व्यवहारांचे कामकाज पाहण्यासाठी किरण काशीनाथ जोगदंड याला गेल्या चार वर्षांपासून नोकरीवर ठेवले होते. चव्हाण हे निवडणुकीच्या कामासाठी वारंवार बाहेरगावी जात असल्याने आर्थिक व्यवहाराचा संपूर्ण अधिकार(त्र्ीेव) किरणकडे सोपवण्यात आला होता.

मार्च २०२५ मध्ये खात्याच्या तपासणीदरम्यान त्यामध्ये मोठी आर्थिक तफावत असल्याचे शरद चव्हाण यांच्या लक्षात आले. त्यांनतर त्यांनी ग्राहक सेवा केंद्रामार्फत झालेल्या सर्व व्यवहारांची चौकशी सुरू केली. सीसीटीव्ही फुटेज व बँक स्टेटमेंट तपासल्यानंतर हे उघड झाले की, मागील जवळपास तीन वर्षांच्या कालावधीत किरण जोगदंड याने मित्र शुभम जोगदंड, बहीण पूजा जोगदंड, पत्नी वैष्णवी जोगदंड आणि मित्र सुनिल पाटोळे यांच्या खात्यांवर विविध तारखांना रक्कम जमा करून ती परत स्वतःकडे घेतली होती. बँक ऑफ इंडियाच्या शाखेतील व एयरटेल पेमेंट बँकेच्या खात्यांमधून किरण जोगदंड याने तब्बल ६ लाख ८ हजार ६०० रुपयांचा अपहार केला असून, संबंधित रक्कम फसवणुकीने हस्तांतरित करण्यात आल्याचे निष्पन्न झाले. किरण याने हेतुपुरस्सर विश्वासघात करून स्वतःच्या नातेवाईकांच्या मदतीने रक्कम परस्पर ट्रान्सफर करून फसवणूक केली असल्याचे शरद चव्हाण यांनी फिर्यादीत नमूद केले आहे. किरण जोगदंड याच्या विरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरिक्षक ज्ञानेश्वर कांबळे करत आहेत.

बीड सरकार

■ बुधवार दिनांक २३ जुलै २०२५



# संपादकीय

## माय लॉर्ड, विश्वास ढळतोय!

संसदेचे पावसाळी अधिवेशन विरोधक आणि सत्ताधाऱ्यांच्या आरोप-प्रत्यारोपांत सोमवारी सुरू झाले. पहिल्याच दिवशी अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरोधात महाभियोग आणण्याच्या प्रस्तावासाठी दोन्ही बाजूंच्या २०८ हून अधिक खासदारांचे एकमत झाले. महाभियोग म्हणजे काय? तर, वर्मा यांना न्यायमूर्ती पदावरून हटवण्यासाठी संविधानिक प्रक्रिया. देशाच्या न्यायव्यवस्थेला हादरवून टाकणारी घटना चार महिन्यांपूर्वी दिल्लीत घडली. होळीच्या रात्री न्यायमूर्ती वर्मा यांच्या दिल्लीतील सरकारी निवासस्थानी अचानक आग लागली. आगीवर नियंत्रण मिळवताना एका खोलीतून नोटांचे ढीग अग्निशमन दलाला सापडले. एक संपूर्ण खोलीच रोख रकमेने भरली होती. या पैशांची मोजणी आणि तपासणी सुरू झाली. त्यातून मोठा आर्थिक गैरव्यवहाराचा संशय बळावला. आगीत जळालेल्या एकूण नोटांची किंमत होती, पाच, पंधरा की पन्नास कोटी? हा वादाचा मुद्दा असला तरी न्यायमूर्तींच्या अधिकृत निवासस्थानी एवढी मोठी रक्कम कशी सापडली? कोणी दिली? कोणत्या कामासाठी दिली? असे अनेक प्रश्न त्यातून उपस्थित झाले. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक अंतर्गत चौकशी समिती नेमण्यात आली. या समितीने सादर केलेल्या अहवालात, आढळलेली रोख रक्कम ही न्यायमूर्ती वर्मा व त्यांच्या कुटुंबीयांची असून तिचा स्रोत त्यांनी स्पष्ट केलेला नाही, हे उघड झाले. त्यामुळेच समितीने त्यांच्यावर महाभियोग चालवण्याची शिफारस केली. मात्र, न्या. वर्मा यांनी न्यायाधीशांविरुद्धच्या तक्रारींमधील अंतर्गत चौकशी प्रक्रियेलाही सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले.

सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत न्या. वर्मा यांनी भारताचे माजी सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदावरून काढून टाकण्याची केलेली शिफारस असंवैधानिक घोषित करावी अशी विनंती केली होती. दुसऱ्या बाजूला केंद्र सरकारने न्या. वर्मा यांना पदावरून हटविण्यासाठी संसदेत महाभियोग प्रस्ताव आणला. त्याला विरोधी पक्षाच्या खासदारांचे पाठबळ मिळाल्याने न्या. वर्मा यांचा पाय अधिक खोलात आहे असे म्हणावे लागेल.

वर्मा हे दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती असताना आगीतून 'कॅशकांड' उघड झाले. त्यानंतर त्यांची अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली झाली. भ्रष्टाचाराचा ठपका माथ्यावर घेऊन त्यांनी न्यायदानाचे काम करावे की नाही, यावरून बराच ऊहापोह झाला. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या बार असोसिएशनने वर्मांच्या नियुक्तीस कडाडून विरोध केला. जो न्यायाधीश दिल्लीत भ्रष्टाचार करतो, तो अलाहाबाद उच्च न्यायालयात करणार नाही याची गॅरंटी कोण देणार?, अलाहाबाद उच्च न्यायालय म्हणजे कचराकुंडी नव्हे, असे बार असोसिएशनचे म्हणणे होते. त्यामुळे न्या. वर्मा यांचे अलाहाबादला परत जाणे बारगळले व त्यांनी स्वत:च रजेवर जाण्याचा निर्णय घेतला. कॅशकांडशी आपला संबंध नसल्याचा दावा करत न्या. वर्मा यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. कोणतीही अधिकृत तक्रार नसताना चौकशी सुरू करण्यात आली आहे. अंतिम अहवाल तपासण्यासाठी वेळ न देता मला राजीनामा देण्यासाठी दबाव आणला, सर्वोच्च न्यायालयास शिस्तभंगाचा अधिकार नाही, सरन्यायाधीशांना किंवा सुप्रीम कोर्टाला अन्य न्यायाधीशांवर नियंत्रणाचा घटनात्मक अधिकार नाही, असा युक्तिवाद न्या. वर्मा यांच्यावतीने सर्वोच्च न्यायालयात करण्यात आला.

मात्र, दुसऱ्या बाजूला न्या. वर्मा यांना पदमुक्त करण्याची प्रक्रिया देशाच्या सर्वोच्च सभागृहात सुरू झाली आहे. त्याचे कारण भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १२४, २१७ आणि २१८ मध्ये न्यायमूर्तींना हटवण्याबाबतची प्रक्रिया सांगितली आहे. महाभियोग प्रस्ताव स्वीकारायचा की नाही, हे पूर्णतः लोकसभेचे अध्यक्ष आणि राज्यसभेचे सभापती यांच्या निर्णयावर अवलंबून असते. प्रस्ताव स्वीकारल्यानंतर एक उच्चस्तरीय तपास समिती गठीत केली जाते. या समितीत सर्वोच्च न्यायालयाचे आणि उच्च न्यायालयांचे न्यायाधीश असतात. समिती दोन ते तीन महिन्यांत चौकशी करून अहवाल सादर करते. या अहवालात आरोपांना दुजोरा देण्यात आला, तर संसदेत प्रस्ताव मांडण्यात येतो आणि दोन्ही सभागृहांनी दोन-तृतीयांश बहुमताने मंजुरी दिल्यानंतर तो राष्ट्रपतींकडे पाठवला जातो. राष्ट्रपतींची मान्यता मिळाल्यावर संबंधित न्यायाधीशाला पदावरून हटवले जाते.

वर्मा यांना हटविले जाईल की नाही, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल. परंतु, न्याय व्यवस्थेला संशयाच्या भोवऱ्यात आणणाऱ्या 'माय लॉर्ड'मुळे जनतेच्या विश्वासाला तडा जाता कामा नये, याची काळजी न्याययंत्रणेत काम करणाऱ्या प्रत्येक जबाबदार व्यक्तीची आहे. भारतीय जनतेचा आजही न्यायव्यवस्थेवर प्रचंड विश्वास आहे. आपल्यावर अन्याय झाला तर तो न्यायालयात दाद मागतो. न्यायालयात नक्कीच न्याय मिळेल, असा त्याचा विश्वास आहे. अलीकडच्या काळात निवृत्तीनंतर न्यायमूर्ती राज्यपाल किंवा राज्यसभेचे खासदार होतात. लाभाची पदे मिळवतात अशी अनेक उदाहरणे आहेत. हे प्रकार सर्वसामान्य भारतीयांना न पटणारे आहेत. त्यात न्याययंत्रणेतील 'तारीख पे तारीख'मुळे निकालाला जो उशीर होतो, त्यावरून जनतेच्या मनात नाराजी आहे. न्यायव्यवस्था पारदर्शक व निष्पक्ष असावी अशी जनतेची माफक अपेक्षा असते. पण, पंधरा कोटी रुपयांच्या जळालेल्या नोटांची पुडकी व्हायरल झाल्यानंतर, न्यायमूर्ती वर्मा हे एकटेच अडचणीत आले नाहीत, संपूर्ण न्याययंत्रणेला संशयाच्या भोवऱ्यात टाकले, हे विसरून चालणार नाही.

## कोरड्या खोकल्यामुळे होणारा धोका कसा टाळता येईल?

* मध देखील कोरड्या खोकल्याला कमी करण्यासाठी मदत करतं. एक चमचा मधात आलं मिसळून त्याचे सेवन केल्यानं कोरड्या खोकल्या पासून सुटका मिळेल.

* आल्याचा वापर देखील कोरड्या खोकल्यासाठी फायदेशीर आहे. सर्दी पडसं असल्यावर आपण आल्याचा चहा तर पितंच असाल हा चहा जेवढा चवीला चांगला आहे तेवढेच आल्याचे गुणधर्म देखील फायदेशीर आहे. कोरड्या खोकल्यात आल्याचा सेवनाने आराम मिळतो. आल्याचे बारीक बारीक तुकडे करून एक कप पाण्यात गॅस वर उकळी घ्या. या पाण्याला दिवसभर थोडं-थोडं करून प्या. कोरडा खोकला बरे करण्यासाठी या पेया पेक्षा चांगले काहीच नाही.



* ज्येष्ठमध देखील औषधीच आहे. हे कफ कमी करण्याचं काम करतं. ज्येष्ठमधात अँटी इंफ्लेमेटरीचे गुणधर्म असतात. एक कप गरम पाण्यात दोन ज्येष्ठमधाच्या कांड्या टाका. याला १५ ते २० मिनिटे चांगली उकळी घ्या. दिवसातून थोडं थोडं पाणी प्यायल्याने खोकला कमी होऊ लागेल. **कोरड्या खोकल्याचे धोके काय आहेत :**

कोरड्या खोकल्यात कफ कमी निघतो किंवा अजिबात निघत नसतो. यामुळे छातीत जळजळ होते बऱ्याच दिवस त्रास असल्यामुळे घसा देखील खवखवतो. काही प्रकरणांमध्ये नाकाची एलर्जी, आम्लपित्त, दमा, क्रॉनिक ऑब्सट्रक्टिव पल्मोनरी डिजीज किंवा ट्युबरक्लॉसिस (टीबी) सारखे त्रास उद्भवू शकतात. म्हणून कोरडा खोकला कोणास असलास, तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. त्वरितच वैद्यकीय सल्ला घ्यावा.

## समाजसेवेचा तेजोमय दीपस्तंभ



एखाद्या व्यक्तीच्या जीवनात जर सेवाभाव हा श्वासासारखा नैसर्गिक झाला, तर तिचं संपूर्ण अस्तित्वच समाजासाठी समर्पित होऊन जातं. 'जस्मिन शाह' हे असंच एक तेजस्वी नाव, ज्यांचं जीवन म्हणजे नि:स्वार्थ सेवेचा अविरत झराच. त्यांच्या कृती, कर्तृत्व आणि करुणेचा परीघ केवळ शहरापुरता मर्यादित नसून, तो दूरवरच्या ग्रामीण व आदिवासी भागातही पोहोचलेला आहे.

गेल्या २० वर्षांहून अधिक काळापासून त्यांनी आरोग्य, महिला सशक्तीकरण, सामाजिक सुधारणा आणि सामूहिक कल्याण या क्षेत्रांमध्ये अतुलनीय कार्य केलं आहे. त्यांचे सामाजिक कार्य म्हणजे समाजाच्या अंतरंगात उमलणाऱ्या आशेच्या सुगंधी फुलाप्रमाणे आहे. त्यांची कामगिरी ही कधी रुग्णालयांच्या उभारणीतून दिसते, तर कधी अनाथ बालकांच्या डोळ्यांतील आनंदाश्रूतून प्रकट होते.

पाच पिढ्यांसह एका घरात राहणाऱ्या जस्मिनताईंनी कौटुंबिक जबाबदाऱ्या देखील तेवढ्याच कौशल्याने पार पाडल्या आहेत. दोन अपत्यांची माय आणि एक अष्टपैलू गृहिणी म्हणून त्या घर आणि बाहेर यामध्ये एक अद्वितीय समतोल साधतात. त्यांनी गृहशास्त्र, व्यावसायिक कला, फॅशन डिझाईन, योग आणि जैन तत्त्वज्ञान या विविध क्षेत्रांमध्ये आपले ज्ञान संपादन केले असून, आजही त्या स्वयंअध्ययनातून स्वतःला वेळोवेळी नव्याने घडवत आहेत. बालपणी आजोबांच्या दानशूर व्यक्तिमत्त्वाचे बीज पेरले गेल्याने व सासरी आल्यानंतर सासऱ्यांच्या समाजभान जपणाऱ्या कार्याने प्रेरित होऊन जस्मिनताई अविरत कार्यरत आहेत. निकोप आणि निरोगी आरोग्य सगळ्यांना लाभावे याकरिता आरोग्य क्षेत्रातील त्यांचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे. त्यांनी ९५००हून अधिक लोकांना योगसाधना शिकवली आहे. महिलांना शारीरिक, मानसिक व सामाजिक दृष्टिकोनातून सक्षम बनवले आहे. त्यांच्या मार्गदर्शनातून उभे राहिलेले वैद्यकीय केंद्र व रुग्णालये अनेक कुटुंबांना आरोग्याचा नवा श्वास देत आहेत.या सेवाभावाला अधिक व्यापक रूप देण्यासाठी त्यांनी 'प्रेमकांत फाऊंडेशन' ही संस्था स्थापन केली. गेल्या ४९ वर्षातील जैन समूहातील इतिहासात जस्मिनताई या संस्थेच्या पहिल्या महिला विश्वस्त म्हणून कार्य करीत आहेत. जी संस्था आज अनाथ बालक, निराधार वृद्ध, ग्रामीण कुटुंबे, बेरोजगार महिलांना रोजगार प्रशिक्षण, जखमी प्राणी आणि अपंगांपर्यंत सेवा पोहोचवते. त्यांच्या या कार्यामुळे शेकडो दात्यांना योग्य ठिकाणी मदत पोचवण्याचा एक विश्वासार्ह दुवा मिळाला आहे.

गेल्या ७ वर्षापासून विविध सामाजिक प्रश्नावर या संस्थेने उल्लेखनीय कार्य केले आहे. गोरगरीब पालकांच्या मुलांसाठी कार्यशाळा, शैक्षणिक साहित्य वाटप, गणवेश, दप्तरांचे वाटप, प्रसंगी मुलांची शाळेची फी भरून वंचित मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रमुख काम त्यांनी केले आहे. समाजातील आर्थिकदृष्टीने दुर्बल घटकांसाठी, अबला महिला, वयोवृद्ध लोकांसाठी वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करणे, अंध, दिव्यांग, मानसिक दिव्यांग तसेच सहवास मतिमंद मुलांच्या निवासी प्रकल्पवार असलेल्या ३२ मुलांसाठी योग-मेडिटेशन सेंटरचे निर्माण त्यांनी केले आहे. अन्नछत्र (भोजन-कक्ष) व गोशाळेची निर्मिती जस्मिनताईंनी केली. एवढेच करून त्या थांबल्या नाहीत तर, दर महिन्याला अन्नधान्य, नियमितपणे मुलांना लागणारे मूलभूत सामग्रीचे (टीव्ही, कूलर, गिजर, वॉटर फिल्टर, बेड-गाद्या) तसेच विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांनी (दिव्यांग)मुलांचे आयुष्य सुसह्य करण्यासाठी विशेष योगदान दिले.

मेंटल हॉस्पिटल, ठाणे या ठिकाणी मेडिटेशन योग कार्यक्रम, फॅशन डिजाईन, ज्वेलरी मेकिंगचे प्रशिक्षण देऊन महिलांना स्वतःच्या पायावर उभं राहता यावं यासाठी विशेष प्रयत्न प्रेमकांत फाऊंडेशन मार्फत केले जात आहेत.

मुंबई क्षेत्रात मेडिकल क्लिनिकमधून अल्प दरात रुग्णांना औषधं उपलब्ध करून देऊन, योग्य किंबहुना मोफत उपचार या संस्थेच्या माध्यमातून सुरु आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यात देखील प्रेमकांत फाऊंडेशन कार्यरत आहे. त्यांचे कार्य हे फक्त जैन समूहापूर्ती मर्यादित न राहता त्याचा विस्तार हा संपूर्ण राष्ट्रासाठी व्हावा याकरिता राष्ट्रीय स्वंयसेवक दल, विहिंप यासारख्या संस्थांशी संलग्न होऊन हिंदू संस्कृती आणि परंपरा जतन करण्याचे मोलाचे कार्य त्या करत आहेत. तसेच सेवा कनेक्ट या नवीन पोर्टलद्वारे जगभरातील लोकांपर्यंत आवश्यक ती माहिती पोहोचवली जाणार आहे. विशेष म्हणजे येत्या १ जुलै २०२५ रोजी गोमातेसाठी जळगाव जिल्ह्यात या फाऊंडेशन मार्फत गोशाळेची लवकरच निर्मिती होणार आहे. गोमातांसाठी लागणारा चारा पुरवला जाऊन त्यांच्यासाठी तिथे शेड बांधण्यात येणार आहे. तसेच नुकतीच त्यांनी बदलापूर येथे एक म्बुलन्स तिथल्या आदिवासी पाड्यातील प्राण्यांना नवसंजीवन देण्यासाठी दान केली आहे.


समाजात वावरत असताना मनुष्याप्रमाणेच पर्यावरण व प्राणी हा देखील एक आपल्या जगण्याचा अविभाज्य घटक जपण्याची संवेदनशीलता जस्मिनताईंच्या कार्यातून दिसून येते. या समर्पित कार्याची दखल घेऊन त्यांना विविध सन्मानांनी गौरवण्यात आले आहे, ज्यामध्ये अटल बिहारी वाजपेयी फाऊंडेशनचा अत्युच्च सन्मान राष्ट्रीय अटल पुरस्कार २०२४, नारी उत्कर्ष २०२४, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते कच्छी पगडी गौरव, ठाणे गौरव पुरस्कार २०२२, शिवसेना-आनंद दिघे चॅरिटेबल ट्रस्टमार्फत नारी उत्कर्ष २०१४, समाजातील शांततेचा जागर अहिंसा क्रांती पुरस्कार २०२३, गृहरक्षक समितीकडून कोरोना काळातील साहाय्यक कार्यासाठी पोलीस संघर्ष गौरव, प्रमोदिनी संस्थेचा स्त्रीशक्ती सन्मान सावित्री पुरस्कार, सर्वोदय राष्ट्रीय पुरस्कार २०२२ अखिल भारतीय सेवाभावाचा गौरव, महावीर जैन हॉस्पिटल सेवा पुरस्कार - वैद्यकीय सेवेसाठी, कच्छी महिला फेडरेशन सन्मान असे पुरस्कार देऊन त्यांना गौरवण्यात आले.

या सर्व पुरस्कारांच्या झगमगाटापलीकडे, त्यांच्या डोळ्यांतील कृतज्ञतेचा निखळ प्रकाश आणि मनातील सेवाभावाची गूढ शांतता सर्वात मोठी आहे. त्यांचं जीवन म्हणजे नारी शक्तीचं सजीव प्रतीक, जी झुंजते, उभी राहते, आणि समाजालाही उभं करते. महिलांनी स्वतःच्या वेळेचे उत्तम नियोजन करत स्वतःला उत्कृष्टरित्या घडवण्याचा सल्ला त्या समस्त महिलांना देतात.जस्मिन शाह यांच्या कार्यातून आज हजारो आयुष्यं उजळली आहेत, आणि उद्याच्या पिढ्यांसाठी एक दृढ, सुंदर आणि सशक्त मार्ग तयार झाला आहे. अशा या दैदिप्यमान स्त्रीच्या कार्याला शब्दात मांडणं हेच एक मोठं भाग्य! ताईंच्या या अनुकरणीय अशा प्रवासातून अनेक महिलांना निश्चितच प्रेरणा मिळेल. त्यांच्या हातून घडणाऱ्या प्रत्येक उपक्रमाला यश लाभो. त्यांच्या या पवित्र कार्याचा नंदादीप अखंड तेवत राहून समाजातील प्रत्येक स्तर प्रकाशमान होवो या सदिच्छेसह त्यांना पुढील वाटचालीसाठी खूप शुभेच्छा.

## रक्ताभिसरण वाढवण्यासाठी योगासन

दिवसभर कामासाठी शरीर सक्रिय ठेवणे खूप महत्वाचे आहे. अशा परिस्थितीत, संपूर्ण शरीराच्या आरोग्यासाठी चांगले रक्ताभिसरण महत्वाचे आहे, कारण ते अवयवांना ऑक्सिजन आणि पोषण योग्यरित्या पोहोचवते. दररोज काही प्रभावी योगासन केल्याने, शरीरात रक्त प्रवाह सुधारतो आणि शरीर ऊर्जावान आणि निरोगी राहते.

आजच्या धावपळीच्या आणि दीर्घकाळ बसून राहण्याच्या जीवनशैलीत ही समस्या सामान्य झाली आहे. चांगली गोष्ट म्हणजे योगाद्वारे रक्ताभिसरण सुधारता येते.




योग केवळ रक्त प्रवाह सुधारत नाही तर शरीराची शक्ती, ऊर्जा आणि मानसिक संतुलन देखील मजबूत करतो. येथे आम्ही तुम्हाला असे ५ सोपे आणि प्रभावी योगासन सांगत आहोत, जे दररोज केल्यास शरीर सक्रिय, निरोगी आणि उत्साही राहील.

**ताडासन :** ताडासन हे एक सरळ शरीर आसन आहे, जे पाठीचा कणा सरळ करते आणि संपूर्ण शरीरात रक्ताभिसरण सुधारते. हे आसन पायांपासून डोक्यापर्यंत रक्तप्रवाह सुरळीत करते आणि संपूर्ण शरीराला ऊर्जा देते.

**कसे करायचे :** दोन्ही पाय एकत्र ठेवून सरळ उभे रहा.

तुमचे हात वर करा आणि बोटे एकमेकांत जोडा, तुमच्या टाचांवर उभे राहा आणि तुमचे संपूर्ण शरीर ताणा. खोल श्वास घेत ही स्थिती ३० सेकंदांसाठी ठेवा

**सेतुबंधासन :** सेतुबंधासन छाती, मान आणि मणक्याला ताण देते, ज्यामुळे या भागांमध्ये रक्त परिसंचरण सुधारते. हृदयाच्या आरोग्यासाठी देखील हे खूप फायदेशीर आहे.

**कसे करावे:** पाठीवर झोपा, गुडघे वाकवा आणि पाय जमिनीवर ठेवा. तुमचे हात तुमच्या शरीराजवळ ठेवा आणि हळूहळू तुमचे कंबर वर करा. तुमची कंबर, पाठ आणि छाती वरच्या दिशेने ताणा.

**वज्रासन:** हे एकमेव असे आसन आहे जे जेवणानंतरही करता येते. ते पचन सुधारते आणि शरीराच्या खालच्या भागात रक्तप्रवाह सुरळीत करते.

**कसे करावे :** गुडघे वाकवून टाचांवर बसा. दोन्ही हात गुडघ्यांवर ठेवा आणि पाठ सरळ ठेवा. डोळे बंद करा आणि ५-१० मिनिटे हळूहळू श्वास घ्या

**शलभासन:** या योगासनामुळे पाठ, कंबर आणि मांड्यांमध्ये रक्ताभिसरण सुधारते. तसेच पाठीचा कणा आणि पचनशक्ती मजबूत होण्यास मदत होते.

कसे करावे : पोटावर झोपा, दोन्ही हात मांड्यांजवळ ठेवा. आता हळूहळू दोन्ही पाय वर करा (हात आणि छाती जमिनीवर असावी). ही स्थिती २० सेकंदांपर्यंत ठेवा आणि नंतर हळूहळू परत या

## कवठ खाण्याचे फायदे

**✱ पचन चांगले राहते**-चांगली पचनक्षमता ठेवतो , शरीराचे तापमान तसेच कोलेस्ट्रॉल आणि रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करतो .शरीराला थंडावा देतो. तहान शमवून रक्तविकारापासून मुक्त करतो,बद्धकोष्ठतेचा त्रास नाहीसा करतो. पोटाचे जंत नाहीसे करतो.



**✱ रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करत** -झाडाच्या खोड व फांद्यांमध्ये फेरोनि नावाचा डिंक असतो. रक्तातील साखरेचा प्रवाह, स्राव आणि संतुलन व्यवस्थापित करण्यास मदत करतो.हे डिंक इन्सुलिन आणि रक्तातील साखरेची पातळी वाढण्यास रोखतो.

**✱ डोकं दुखी कमी करतो**- हृदय रोग आणि डोकेदुखीसाठी कवीठचे फळ फायदेशीर आहे. याचा सेवन केल्याने डोकेदुखीच्या समस्येपासून मुक्त होतो आणि यामुळे हृदयाचे आरोग्यही राखण्यास मदत करतो. .

**✱ ऊर्जेची पातळी वाढवतो**- या मध्ये जास्त प्रमाणात प्रथिने आढळतात ज्यामुळे ते शरीरास ऊर्जा प्रदान करण्यात मदत करते. याचा उपयोग शरीरात उर्जा टिकवून ठेवण्यासाठी केला जातो. कोणत्याही स्वरूपात याचे सेवन करणे फायदेशीर आहे.

## विनयभंग प्रकरणातही पवार, खाटोकरला जामिन

**बीड (प्रतिनिधी):** उमाकिरण लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या दोघा जणांना न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.

बीड शहरातील उमाकिरण कोचिंग क्लास मधील एका १७ वर्षीय विद्यार्थिनीने दिलेल्या तक्रारीनुसार प्रा विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या दोघांविरुद्ध पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाला होता. पोलिसांनी मांजरसुंबा नजीक या दोघांना अटक केल्यानंतर त्यांना सुरुवातीला पोलीस कोठडी आणि त्यानंतर न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. पवार आणि खातोकर या दोघांविरोधात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल झाले होते. दि.१७ जुलै रोजी पोस्को अंतर्गत दाखल झालेल्या गुन्ह्यात या दोघांना जामीन मिळाल्यानंतर विनयभंग प्रकरणात देखील न्यायालयाने मंगळवारी या दोघांना जामीन मंजूर केला आहे आरोपींच्या वतीने ज्येष्ठ विधीज्ञ बाळासाहेब कोल्हे यांनी काम पाहिले.

## भाजलेल्या पेरूमध्ये लपलेला आहे आरोग्याचा खजिना



**पेरू भाजून खाण्याचे फायदे-** एलर्जी होणार नाही- एलर्जी मध्ये पेरू भाजून खाल्यास अनेक फायदे मिळतात. अनेक लोकांना एलर्जीची समस्या असते. ज्यामध्ये हिस्टमाइन वाढून जाते. अशावेळेस पेरू भाजून खाल्यास या समस्येपासून अराम मिळतो.

**कफापासून अराम-** कफ आणि कंजेशनमध्ये पेरू भाजून खायला हवा, तसेच भाजलेला पेरू खाल्यास कफ पातळ होण्यास मदत होते. याशिवाय ज्या लोकांना एसनोफिल्स वाढून जाते त्यांच्यासाठी पेरू खाणे फायदेशीर असते. ही समस्या कमी होण्यास मदत मिळते.

**ब्लोटिंग मध्ये फायदेमंद-** ब्लोटिंग की समस्या, महिलांना आणि सर्वात जास्त त्रस्त करते अश्यावेळेस पेरू भाजून खाल्यास पोटाला अनेक फायदे मिळतात. यामधून निघणारा अर्क पोटातील एसिडिक पीएचला कमी करते. ज्यामुळे ब्लोटिंगची समस्या कमी होते. सोबतच मुलांचे पोट फुगणे कमी होते.

**सर्दी-जुकाम पासून रक्षण-** पेरू भाजून खाल्याने सर्दी-जुकामची समस्या दूर होते. तसेच आयुर्वेदात मानले जाते की पेरू भाजून खाल्याने शरीरामध्ये संक्रामक आजार होत नाही. बदलत्या वातावरणात आजारांपासून दूर राहण्यासाठी पेरू भाजून खावा.

## नारायणगड विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविसांनी निधी दिला- शंकर देशमुख

**बीड (प्रतिनिधी):** नारायण गडाच्या विकासाला देखील देवेंद्र फडणवीस आणि पंकजा मुंडे यांच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला, असे मत भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी व्यक्त केले आहे.

बीड जिल्ह्यातील धाकटी पंढरी म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या नारायणगड येथे आयोजित केलेल्या रक्तदान शिबिर वृक्षारोपण व शालेय साहित्याच्या वाटपाच्या कार्यक्रमांमध्ये जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख हे बोलत होते. नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या कार्यक्रमास भारतीय जनता पार्टीचे जिल्हा



उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, बीड ग्रामीण मंडळाचे अध्यक्ष मनोज पाटील, भटक्या वीमुक्त आघाडीच्या भाग्यश्री ढाकणे, प्रीत कुकडेच्या, राजू शहाणे इत्यादी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी पुढे बोलताना जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात काम करत असणारे महाराष्ट्र सरकार हे सामान्य माणसाच्या हिताला प्राधान्य देणाऱ्या असून फडणविसांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेवटच्या माणसाचा अंत्योदय झाल्याशिवाय राहणार नाही, अशा प्रकारचे गौरव उदगार देखील त्यानी याप्रसंगी व्यक्त केले. बराणपुरचे सरपंच गणेश लांडे यांच्या पुढाकारातून संपन्न झालेल्या या कार्यक्रमास भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, भाग्यश्री ढाकणे यांनी देखील समयोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते पदाधिकारी व विद्यार्थी शिक्षक उपस्थित होते.

# विशेष वृत्त

## माधवी कुलकर्णीचे सीए इंटरमीडिएट परिक्षेत यश



**गेवराई :** येथील विधिज्ञ ॲड. शरद कुलकर्णी यांची कन्या माधवी कुलकर्णी हिने नुकत्याच झालेल्या सी.ए. इंटरमीडिएट परीक्षेत प्रथम प्रयत्नात ग्रुप ए व ग्रुप बी या दोन्ही ग्रुपमध्ये घवघवीत यश प्राप्त केले आहे. तिने सी.ए. इंटरमीडिएट यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. माधवीचे दहावी पर्यंतचे शिक्षण गेवराई येथील इंदिरा गांधी इंग्लिश स्कूल येथे झाले असून त्यानंतरचे महाविद्यालयीन शिक्षण हे बलभीम कॉलेज, बीड येथे झाले आहे. इयत्ता बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर माधवी हिने चार्टर्ड अकाउंटंट या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला व सी.ए.च्या प्रथम वर्षाच्या फाउंडेशनच्या परीक्षेत तिने प्रथम प्रयत्नातच यश प्राप्त केले होते. त्यानंतर आता सी.ए. इंटरमीडिएट या परीक्षेच्या ग्रुप ए व ग्रुप बी या दोन्ही ग्रुपमध्ये प्रथम प्रयत्नातच यश प्राप्त केले आहे. माधवीच्या यशाबद्दल तिचे अनेकांनी अभिनंदन केले.

## परळी महाविद्यालयात रक्षासुत्र निर्मिती कार्यशाळा

**परळी :** कै लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयातील गृहविज्ञान विभागातर्फे एक दिवशीय रक्षासूत्र निर्माण (राख्या तयार करणे) कार्यशाळेचे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. विद्या देशपांडे या होत्या तर उद्घाटक म्हणून छाया देशमुख या उपस्थित होत्या. या प्रसंगी प्रशिक्षक म्हणून श्यामल उजगरे यांचीही उपस्थिती लाभली. या प्रसंगी छाया देशमुख यांनी मुलींना मोलाचे मार्गदर्शन केले. तर प्राचार्या डॉ. विद्या देशपांडे यानी या कार्यशाळेतून उद्योजक कसे होता येईल या विषयी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. रागिणी पाध्ये यांनी केले. या कार्यक्रमासाठी डॉ. कचरे, डॉ. गुळभिले, डॉ. कुलकर्णी, डॉ. जोशी, डॉ. मुंडे यांची उपस्थिति लाभली.

## भारतीय बौद्ध महासभेच्या केज शहर शाखा अध्यक्षपदी जयपाल मस्के

**केज :** भारतीय बौध्द महासभेची बैठक भीमनगर येथील बौध्द विहारमध्ये जिल्हाध्यक्ष ॲड. बी.बी. धन्वे यांच्या अध्यक्षतेखाली होवून यामध्ये शहराध्यक्ष पदाची जबाबदारी जयपाल मस्के यांना देण्यात आली.

भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा बीड पूर्व अंतर्गत भारतीय बौद्ध महासभा शहर शाखा केजचा कार्यकाळ संपलेला होता. कार्यकाळ संपलेल्या केज शहर शाखा कार्यकारिणी निवडी बाबत महाराष्ट्र राज्य शाखेच्या आदेशान्वये व संस्थेच्या नियमानुसार नवीन शहर कार्यकारिणी निवड करण्यासाठी केज शहरातील वेळूवन बुद्ध विहार भीमनगर येथे जिल्हाध्यक्ष ॲड. बी.बी. धन्वे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाध्यक्ष बी.बी. धन्वे यांनी जुनी कार्यकारिणी बरखास्त करून नवीन पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर केल्या. यामध्ये मागील शाखेमध्ये कार्यरत असणारे सरचिटणीस जयपाल मस्के यांचा कामाचा अनुभव लक्षात घेऊन त्यांना नव्याने शहराचे अध्यक्ष पद देण्यात आले तर सरचिटणीस शिवकुमार मस्के, कोषाध्यक्षपदी चंद्रकांत मस्के व संस्कार उपाध्यक्षपदी महेंद्र मस्के यांची निवड करण्यात आली. यावेळी बौद्ध उपासक उपासिका, बालक-बालिका यांची उपस्थिती होती. या निवडीसाठी नव नियुक्त पदाधिकाऱ्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## जनविकास महाविद्यालयात विद्यार्थी संसद शपथविधी सोहळा

बनसारोळा : येथील जनविकास महाविद्यालयात महाराष्ट्र शासन अंतर्गत सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमा अंतर्गत विद्यार्थी संसद शपथविधी सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई येथील प्राचार्य पाठक व मुकुंदराज महाविद्यालय, अंबाजोगाई येथील प्रा. गवारे तसेच करिअर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक प्रा. डॉ. राजेश गायकवाड यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे यांनी विद्यार्थ्यांना करिअर कट्टा उपक्रमांतर्गत सुरू असणाऱ्या विविध उपक्रमाचा लाभघेण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांना आपले ध्येय पूर्ण करण्यासाठी व अधिकार पदाच्या जागा प्राप्त करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा करिअर कट्टा हा उपक्रम फायदेशीर ठरणार आहे असे मत व्यक्त केले. प्राचार्य पाठक व प्रा. गवारे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. करिअर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक प्रा डॉ. राजेश गायकवाड यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. नंदकिशोर चित्ताडे यांनी केले, प्रस्ताविक प्रा. डॉ. राजेश गायकवाड यांनी केले तर प्रा. डॉ. केशव तिडके यांनी आभार मानले.

## बीड न्यायालयाच्या निर्णयावर धनंजय देशमुखांचे समाधान

**बीड :** केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराडने दोषमुक्तीसाठी न्यायालयात विनंती अर्ज केला होता. न्यायालयातील या अर्जावर २२ जुलै रोजी सुनावणी झाली असून बीड सत्र न्यायालयाने वाल्मिक कराडचा अर्ज फेटाळला आहे. त्यामुळे, देशमुख कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला. असून वाल्मिक कराडसह आरोपींवर आता खंडणीसह खूनाचही खटला चालू राहणार आहे. न्यायालयाच्या या निर्णयाचे वकील उज्वल निकम यांनी स्वागत केल्यानंतर संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांनी देखील समाधान व्यक्त केलं आहे. तसेच, एसआयटीने केलेल्या तपासामुळे हाच निर्णय अपेक्षित होता, असेही त्यांनी म्हटले.

# डाळिंबावरील 'तेल्या' रोगावर औषध संशोधनाचा बीडच्या प्रयोगशील शेतकऱ्याचा दावा!

## सोलापूरच्या राष्ट्रीय डाळींब केंद्रांकडून १५ वर्षापासून संशोधनाकडे दुर्लक्ष

### शेतकऱ्यांच्या हितासाठी वनश्री सखाराम शिंदे यांची मुख्यमंत्री,कृषीमंत्र्यांना सत्यता पडताळणीचे आवाहन

बीड (प्रतिनिधी) बीड तालुक्यातील शिवणी येथील प्रयोगशील शेतकरी तथा सन १९९२ मध्ये महाराष्ट्र शासनाचा 'वनश्री' पुरस्कार प्राप्त शेतकरी सखाराम शिंदे यांनी डाळिंबावरील 'तेल्या' या रोगावर स्वत:च्या अनुभवातून वनस्पतीपासून संशोधन करत जैविक औषध तयार केल्याचा दावा केला आहे. ते औषध राज्यभरातील विविध डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या बागेत डाळिंबावर योग्य प्रमाणात फवारणीसाठी दिले. अन् या शेतकऱ्यांच्या डाळिंबांवरील 'तेल्या' रोगाचा नायनाट झाला. त्यानंतर या औषधाला राज्य व केंद्र सरकारकडून परवानगी मिळावी म्हणून सखाराम शिंदे यांनी त्यांनी तयार केलेले औषध सत्यता पडताळणीसाठी प्रयोगशाळेत तपासणी व्हावी म्हणून राष्ट्रीय डाळीब संशोधन,केंद्र शेळगी,(सोलापूर) येथे सन २०१० पासून आजपर्यंत ४ वेळेस पाठवून दिले. डाळींबावरील 'तेल्या' या रोगाच्या तेलकट डागावरील आयुर्वेदीक (जैविक) औषधाची परवानगी मिळावी म्हणून पत्रव्यवहार केले.मात्र मागील १५ वर्षात या संशोधन केंद्रांकडून आपल्या संशोधनाकडे दुर्लक्ष केले गेले असून आता शेतकऱ्यांच्या हितासाठी केंद्रीय कृषीमंत्री, राज्याचे मुख्यमंत्री आणि कृषीमंत्र्यांनी माझ्या औषधाची सत्यता पडताळावी असे निवेदन देणार असल्याचे शिंदे यांनी पत्रकात म्हटले आहे.

याबाबत माहिती देताना वनश्री सखाराम शिंदे यांनी निवेदनात म्हटले आहे की, मी बीड तालुक्याती शिवणी येथील राहिवासी आहे. सन १९९८ पासून मी शेतीमध्ये विवध प्रयोग केले आहेत व करत आहे. १९९७ मध्ये 'आरक्ता' जातीची डाळिबांची एक हजार झाडे माझ्या शेतात लावली होती, त्यानंतर सन २००२ मध्ये भगाव जातीच्या डाळिंबाची ५०० झाडे लावली; मात्र त्या दोन्ही पिकांवर तेल्या रोग आला, त्यामुळे या दोन्ही डाळिंबाच्या बागा नष्ट कराव्या लागल्या. त्यानंतर २००७ मध्ये पुन्हा ३०० डाळिबांची झाडे लावली परंतु त्याच्यावर सुध्दा 'तेल्या' रोग आला पडला. सततच्या या रोगामुळे मी चक्रावून गेलो होतो. असे असतानाच एका वनस्पतीच्या अर्कांने तेल्या रोगाचा बॅक्टेरिया व बुरशी नाहीशी होई, असे माझ्या वाचनात आले होते, त्यानंतर मी माझ्या व माझ्या व माझ्या मित्राच्या बागेत ते औषध फवारणी केली त्यामुळे तेल्या रोगग्रस्त बागेत तेल्या रोग नाहीसा झाला. या औषधाचा सर्व डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना फायदा व्हावा या उद्देशाने मी माझे औषध सन २०१० मध्ये राष्ट्रीय डाळीब संशोधन,केंद्र शेळगी,(सोलापूर) येथे तपासणीसाठी दिले. ते एक लीटर पाण्यात १० मि.ली. औषध टाकावे. आठ दिवसाला औषध फवारी करावी नंतर येणारे फुले, पान हे तेल्या रोगमुक्त असतील, असा विश्वास मी त्यांना औषधाची मला परवानगी द्यावी अशी मागणी केली मात्र मागील १५ वर्षात या संशोधन केंद्रांती शास्त्रज्ञांनी आपल्या संशोधनाकडे दुर्लक्ष केले असल्याचा आरोप सखाराम शिंदे यांनी केला आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही मुख्यमंत्री आणि कृषीमंत्र्यांनी माझ्या औषधाची सत्यता पडताळावी असे आवाहन शिंदे यांनी केले आहे.शेतकरी सखाराम शिंदे यांनी म्हटले आहे. तसेच शिंदे यांनी त्यांनी ज्या शेतकऱ्यांना डाळिंब बागेत फवारणीसाठी औषध दिले व तिथे 'तेल्या' रोग नाहीसा झाला, त्या शेतकऱ्यांचे नाव, गाव व मोबाईल क्रमांकही सोबत जोडले आहेत.



### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह कृषी मंत्र्यांनी औषधाची प्रयोगशाळेत सत्यता पडताळावी!

भारत कृषी प्रधान देश असून भारत शेतीवरच जगतो, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, दोन्ही मुख्यमंत्री आणि कृषी मंत्री यांना माझे आवाहन आहे की, मी तयार केलेले लाल्या रोगावरील औषध आपण स्वत: तपासावे. ते इतर काही शेतकर्यांना डाळींबावर फवारण्यासाठी द्यावे. त्याचे रिझल्ट काय येतात, त्या औषधाची सतत्या नेमकी पडताळून पहावी. डाळींब संशोधन केंद्राच्या 'लॅब'मध्ये या औषधाची तपासणी करुन त्याचे खरे रिझल्ट शेतकर्यांसमोर येवू द्यावेत असे आवाहनही राज्य शासनाचा 'वनश्री पुरस्कार' प्राप्त शेतकरी सखाराम शिंदे यांनी केले आहे.

### ....तर देशभरातील डाळिंब उत्पादकांना होईल फायदा

शेतपिकांवरील फळबागांवरील रोग जसे निसर्गात तयार होतात तसेच त्याचे औषधही निसर्गातच तयार करता येते हा माझा अभ्यास होता. डाळींब संशोधन केंद्र एकमेव सोलापूरला आहे.
शेतकरीही शास्त्रज्ञ होवू शकतो हा मला विश्वास होता, लाल्या रोगामुळे महाराष्ट्र आणि देशातील डाळींब उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडत असतात. मात्र मी तयार केलेले औषध संशोधनाअंती सिध्द झाले तर अनेक शेतकर्यांना त्याचा लाभ होईल अशी माझी प्रांजळ भावना आहे अशी प्रतिक्रिया प्रयोगशील शेतकरी सखाराम शिंदे यांनी व्यक्त केली आहे.

## स्मार्ट प्रीपेड मीटरला विरोध करा - सामाजिक कार्यकर्ते जे.डी. शाह

**गेवराई (प्रतिनिधी):-** जिल्ह्यात महावितरण कंपनीकडून सगळीकडे जुने मीटर काढून नवीन स्मार्ट मीटर लावण्याचा बेकायदा धडाका सुरू केला आहे. कोणतीही वीजकंपनी त्यांच्या कायमस्वरूपी वीजपुरवठा असणाऱ्या कोणत्याही वीजग्राहकावर स्मार्ट प्रीपेड वीजमीटर बसविण्याच्या बाबतीत एकतर्फी धोरणात्मक निर्णयाची भीती घालून ग्राहकांना नको असलेले नवीन स्मार्ट मीटर बसवायचा प्रयत्न चालवला आहे. त्याला टोकाचा विरोध करून हा लुटारू डाव हाणून पाडण्यासाठी विज ग्राहकांनी जागृत राहून आपल्या घरात, दुकानात, उद्योगाच्या ठिकाणी स्मार्ट मीटर बसवून घेऊ नये, असे आवाहन जेष्ठ समाजसेवक जे.डी. शाह यांनी ऐका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. महावितरण कंपनीच्यावतीने जुने मीटर काढून नवीन स्मार्ट मीटर लावण्याचे काम सुरू केले आहे. याला विरोध करण्यासाठी महाराष्ट्रातील जिल्ह्यात तसेच तालुक्यातून शेकडो ग्राहकांच्या तक्रारी दाखल करण्यात येणार आहे. कारण महावितरण कंपनीने

त्यांच्या एमओएममध्ये ग्राहकाचा मीटर बदलण्याचा घेतलेला तथाकथित धोरणात्मक निर्णय पूर्णतः एकतर्फी आहे. घटनेने, वीज कायद्याने आणि ग्राहक संरक्षण कायद्याने दिलेल्या ग्राहकांच्या मूलभूत हक्क, अधिकार, संरक्षणाचे उल्लंघन करणारा आहे. विद्युत कायद्यातील कलम ४७ च्या ५ नुसार मीटरबाबत कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार फक्त आणि फक्त ग्राहकाचाच आहे. तसेच वीज नियामक आयोगाचे स्मार्ट प्रीपेड मीटरच्या संदर्भात आलेली २०२४ सालची नियमावली आणि कर्नाटक उच्च न्यायालयाने २५ एप्रिल २०२५ रोजी कोणत्याही ग्राहकाला त्याच्या परवानगीशिवाय स्मार्ट मीटर लावता येणार नाही असा आदेश पारित केला आहे. ग्राहकांना स्मार्ट मीटर बसविण्याचा निर्णय शासनाचा नाही, कुठलाही न्यायालयाचा नाही आणि आयोगाचा नाही. उलट नुकतेच कर्नाटकच्या उच्च न्यायालयाने वीज ग्राहकांच्या पूर्वपरवानगीशिवाय मीटर बसवता येणार नाही असे निर्दे श दिले आहेत. तसेच महावितरण कंपनीने सक्तीने असे मीटर लावण्याचा प्रयत्न केल्यास बीड जिल्ह्यातील सर्व विज ग्राहकांनी तात्काळ स्मार्ट प्रीपेड मीटर अमान्य आहे असा अर्ज दाखल करावा असे पत्रात नमूद करण्यात आले आहे. आपल्या कार्यक्षेत्रातील कार्यकारी अभियंता, डिव्हिजन यांच्याकडे विषय स्मार्ट/प्रीपेड मीटरला संपूर्ण नकार व सध्याचे पोस्टपेड मीटर व जोडणी आहे तशीच चालू ठेवणेबाबत अर्ज द्यावा, असे आवाहन जे. डी. शहा यांनी केले आहे.


## परळी महाविद्यालयात रक्षासुत्र निर्मिती कार्यशाळा

**परळी (प्रतिनिधी):** कै लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयातील गृहविज्ञान विभागातर्फे एक दिवशीय रक्षासूत्र निर्माण (राख्या तयार करणे) कार्यशाळेचे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. विद्या देशपांडे या होत्या तर उद्घाटक म्हणून छाया देशमुख या उपस्थित होत्या. या प्रसंगी प्रशिक्षक म्हणून श्यामल उजगरे यांचीही उपस्थिती लाभली. या प्रसंगी छाया देशमुख यांनी मुलींना मोलाचे मार्गदर्शन केले. तर प्राचार्या डॉ. विद्या देशपांडे यानी या कार्यशाळेतून उद्योजक कसे होता येईल या विषयी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. रागिणी पाध्ये यांनी केले. या कार्यक्रमासाठी डॉ. कचरे, डॉ. गुळभिले, डॉ. कुलकर्णी, डॉ. जोशी, डॉ. मुंडे यांची उपस्थिति लाभली.


## घरकुल योजनेच्या सर्वेक्षणासाठी आता ३९ जुलैची अंतीम मुदत

### जिल्हा परिषदेसह ग्रामीण विकास यंत्रणेला मुदतीत सर्वेक्षण पूर्ण करण्याच्या सूचना

**गेवराई (प्रतिनिधी):** ग्रामीण गृहनिर्माण संचालक राजाराम डॉ. राजाराम दिघे यांच्या स्वाक्षरीने जारी ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत पात्र कुटुंबांचे आवास प्लास सर्वेक्षण तातडीने पूर्ण करण्याचे आदेश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेला शासनाने दिले आहेत. यापुर्वी ३ते ४ वेळेस सर्वेक्षणासाठी मुदतवाढ देण्यात आली होती आता महाराष्ट्र शासनाच्या ग्रामीण गृहनिर्माण संचालनालयाने दिलेल्या निर्देशानुसार, ही सर्वेक्षण प्रक्रिया ३१ जुलैपूर्वी पूर्ण करणे बंधनकारक असून यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. पहिला टप्पात सन २०१८ मध्ये करण्यात आलेल्या आवास प्लस यादीमध्ये समावेश न झालेल्या किंवा सिस्टिमने अपात्र ठरवलेल्या परंतु, सध्या पात्र असलेल्या कुटुंबांना यामध्ये नव्याने समाविष्ट करण्यासाठी नवीन निकषांनुसार तपासणी केली जाणार आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमध्ये सर्वेक्षणाला गती देण्यात आली असून, आतापर्यंत सर्वेक्षण झालेल्या गावांना सर्वेक्षण पुर्ण म्हणून आवास सॉफ्ट प्रणालीवर नोंदविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.




याशिवाय सेल्प सर्वे' प्रकरणांची पुष्टी सर्वेक्षकांमार्फत पुष्टी करून घेणे आणि 'फ्लेग' झालेल्या प्रकरणांचे 'चेकर' मार्फत पडताळणी या प्रक्रियाही ३१ जुलैपर्यंत पूर्ण कराव्यात, अशी सूचना करण्यात आली आहे. आवास सॉफ्ट ॲप द्वारे सर्वेक्षण सुरु आहे कुटुंबातील एका व्यक्तिचे यात सर्वेक्षण करता येते सर्वेक्षणासाठी स्वतः लाभ घेणारा व्यक्ती हजर लागतो मात्र ग्रामीण भागातील अनेक कुटुंबे मोलमजुरी करण्यासाठी पुणे, मुंबईसारख्या ठीकाणी गेलेले आहेत त्यांच्या कुटुंबीयातील कोणीही व्यक्ती गावाकडे राहत नाहीत शहरातही त्यांचे वास्तव्य एका ठिकाणी राहत नाही त्यामुळे ते घरकुल योजनेपासून वंचीत राहण्याची शक्यता आहे यावर शासनाने वीचार करून अशा मजुरांना गावातच घरकुलाचा लाभ कसा देता येईल यावर विचार करावा.

## वातावरणात उष्णता अजूनही कायम; पंखे सुरुच

### पावसाची प्रतिक्षा कायम, पिकांनी टाकल्या माना

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):** जुलै महिन्यात पावसामुळे हुडहुडी भरते मात्र यंदा वातावरणातील उष्णता कायम आहे. त्यामुळे घरोघरी उन्हाळ्यात सुरु असणारे पंखे जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यातही सुरूच दिसत आहे. अंबाजोगाई तालुक्यात पुरेसा पाऊस न झाल्याने दिवस रात्र उष्णता जाणवते, तसेच मच्छरांचा उपद्रवही खूप वाढला आहे. त्यामुळे रात्रंदिवस कूलर, पंखे सुरू असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे.

जून-जुलै हे महिने पावसाचे असतात. नदी-नाल्यांना दुथडी भरून आलेला पूर पाहण्याचे दिवस असतात. मात्र, यंदा तालुक्यातील नागरिकांना नदी, नाले दुथडी भरून वाहताना दिसले नाही. अजूनही नदी नाल्यांना पूर आलेला नाही. नदीमध्ये निघालेली जलपर्णी वनस्पती व झाडेझुडपे पूर न आल्यामुळे अजूनही तहाणलेलेच आहेत. सोबतच मुक्या प्राण्यांना पिण्याचे पाणी शोधावे लागत आहे. तसेच पाळीव प्राण्यांना सुद्धा पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. शेतातील कपाशी, सोयाबीन, तूर या महत्त्वाच्या पिकांसह इतरही पिके लावली गेली मात्र रिमझिम पाऊस अधूनमधून येत असल्याने पिके कसेतरी तग धरून आहे. काही शेतकऱ्यांनी स्प्रिंकलर व ठिंबक द्वारे पिकांना पाणी देणे सुरू केले आहे. तालुक्यात पेरणीपूर्वी व निसर्गाचा लहरीपणा निसर्गाच्या लहरीपणाची व दरवर्षी आर्थिक नुकसानीची जाणीव असताना शेती हा पिढीजात व्यवसाय शेतकऱ्यांना करावाच लागतो. आर्थिक व्यवस्था नसताना कर्ज काढून शेतीत लागवड करावीच लागते. कर्ज काढून निसर्गाच्या भरवशावर हा जुगार दरवर्षी शेतकरी खेळत आहे मात्र जुगाराचा डाव दरवर्षी शेतकऱ्यांसाठी नुकसानीचा ठरत असल्याने शेतकरी मेटाकुटीस आला असून दरवर्षी कर्जबाजारी होत आहे. पेरणीनंतरही दणक्याचा पाऊस आला नाही. त्यामुळे जमिनीत जेमतेमच ओलावा आहे. आता पाऊसच पुरेसा नसल्याने ज्यांच्याकडे सिंचनाची व्यवस्था आहे त्या शेतकऱ्यांनी स्प्रिंकलर व ठिंबकचा वापर सुरु केला.



## बीडचा इतिहास उज्वल, बदनामी थांबवा: डॉ. सतिष साळुंके

**बीड (प्रतिनिधी):** बीडचा इतिहास वैभवशाली आहे. प्राचीन व मध्ययुगीन कालखंडाच्या इतिहासात बीड हे केंद्रस्थानी होते असा उज्वल इतिहास असलेल्या बीडची बदनामी थांबायला हवी, असे मत डॉ. सतिष साळुंके यांनी व्यक्त केले आहे.

प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे, आपण खास शालेय विद्यार्थ्यांसाठी बीड जिल्ह्याच्या वैभवशाली इतिहासावर पुस्तक लिहिले असून त्याच्या दहा हजार प्रती छापून त्या जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांपर्यंत मोफत पोहोचवण्याचा संकल्प असल्याचे प्रतिपादन इतिहासतज्ञ व राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक डॉ. सतीश साळुंके यांनी केले. पुस्तक प्रकाशित करण्यासाठी मोठा खर्च येणार असून जिल्ह्यातील दानशूर व्यक्तींच्या प्रतिक्षेत ते आहेत. वर्तमान काळात अनेक कारणाने बीड बदनाम होत आहे. त्यात फार तथ्य नाही. मात्र जिल्ह्यातील पुढच्या पिढीला आमचा वैभवशाली इतिहास कळावा की जेणेकरून वर्तमान काळातील बदनामीचा त्यांना विसर पडेल व त्यांच्यात बीड जिल्ह्याविषयी सकारात्मकता विकसित होऊन उज्वल इतिहास असणाऱ्या बीडच्या भूमीवर प्रेम करणारी भूमिपुत्रांची पिढी उदयाला येऊन शकेल. सदर पुस्तक मुलांना कळेल अशा भाषेत अत्याधुनिक पद्धतीने लिहिले असून त्यात क्यू आर कोडचा वापर केल्याने वाचकांना त्या त्या मजकुराचा माहितीपट ही पाहता येणार आहे हे विशेष.

## ना.पंकजाताई मुंडेंनी मंजूर केलेल्या परळीच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयासाठी

# ७२ एकर शासकीय गायरान जमीन पशुसंवर्धन विभागाला प्रदान

### महसूल व वन विभागाचा आदेश निर्गमित;महाविद्यालय उभारणीचा मार्ग मोकळा

मुंबई (सरकार): राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी मंजूर करून आणलेल्या परळीच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयासाठी परळी व लोणी येथील ७२ एकर शासकीय गायरान जमीन महसूल व वन विभागाने पशुसंवर्धन विभागाला प्रदान केली आहे.याबाबतचा शासन निर्णय आज निर्गमित करण्यात आला.

या आदेशामुळे परळी वैजनाथ येथे नवे पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. परळी तालुक्यातील मौजे लोणी येथील गट क्र. ०७ मधील ८ हेक्टर ८० आर (२२ एकर) व मौजे परळी येथील स.नं. ४७८ मधील २० हेक्टर (५० एकर) अशी एकूण ७२ एकर जमीन नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय आणि पशुधन प्रक्षेत्र उभारणीसाठी प्रदान करण्यात येणार आहे. या संदर्भातील शासन मान्यता महसूल व वन विभागाने हा प्रस्ताव मंजूर



केला आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ व त्यासंबंधित नियमांनुसार ही जमीन पशुसंवर्धन विभागाला हस्तांतरित करण्यात येणार आहे.या निर्णयामुळे बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाडा भागातील पशुवैद्यकीय शिक्षण व संशोधनाला नवे बळ



मिळेल आणि शेतकरी व पशुपालकांना आधुनिक सेवा देण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण होण्यास मदत होणार आहे. परळीत होणाऱ्या पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या माध्यमातून मराठवाड्यात एक मोठे शैक्षणिक केंद्र उभारले जाणार आहे. पंकजाताई मुंडे यांनी मंत्री होताच पुढाकार घेऊन पाठपुरावा करत शासन दरबारी हा प्रकल्प मंजूर करून घेतलेला आहे.स्थानिक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी नवे दालन उभे राहणार आहे. पशुसंवर्धन संशोधनासाठी स्वतंत्र प्रक्षेत्र निर्माण होईल. स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना तसेच शेतकरी व पशुपालकांसाठी तांत्रिक व आधुनिक सेवा उपलब्ध होणार आहेत. दरम्यान, महाविद्यालया करिता जागा उपलब्ध झाल्यामुळे आता या प्रक्रियेला गती मिळणार आहे. आधुनिक सुविधा आणि तंत्रज्ञानाची जोड असलेले हे महाविद्यालय परळी तालुक्याचे लौकिक वाढवेल. सोबतच राज्याच्या पशूवैद्यकीय क्षेत्राला देखील यामुळे नवी उभारी मिळेल असं सांगत ना. पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक सेवा सप्ताह

### मान्यवरांच्या उपस्थितीत रक्तदान शिबीराचे उदघाटन,११० जणांनी केले रक्तदान

परळी (सरकार): पंकजाताई मुंडे यांच्या रूपाने परळीला आणि महाराष्ट्राला चारित्र्यसंपन्न, निष्कलंक आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व मिळाले आहे. हे सर्वगुणसंपन्न नेतृत्व आपण जपले पहिजे असे प्रतिपादन भाजपाचे जेष्ठ नेते, वैद्यनाथ बँकेचे माजी चेअरमन विकासराव डुबे यांनी आज केले. राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला. या शिबिरात ११० जणांनी रक्तदान केले.

ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित २१ ते २६ जुलै दरम्यान शहर भाजपच्या वतीने सामाजिक सेवा सप्ताह राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आज भव्य रक्तदान शिबीर घेण्यात आले. शिबिराचे उदघाटन भाजपाचे तालुकाध्यक्ष राजेश गीते व वसंत (बंडू) निर्मळ यांच्या हस्ते झाले. ना. पंकजाताई मुंडे यांच्या अरुणोदय मार्केट मधील संपर्क कार्यालयात झालेल्या या उदघाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपचे ज्येष्ठ नेते तथा वैद्यनाथ बँकेचे माजी चेअरमन विकासराव डुबे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक सकाळचे पत्रकार प्रा. प्रविण फुटके, दैनिक जनमित्रचे संपादक बालासाहेब कडबाने, भाजपच्या ज्येष्ठ नेत्या



डॉ. शालिनीताई कराड, प्रा. पवन मुंडे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना भाजपाच्या शहराध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टी यांनी ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा उपक्रमांतर्गत घेत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. त्या म्हणाल्या की, पंकजाताई यांच्यासारखे नेतृत्व आम्हाला लाभले याचा अभिमान आहे. त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित उपक्रमांचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले. यावेळी पत्रकार प्रा. प्रवीण फुटके म्हणाले की, वृक्षारोपण मोहीम राबवून भाजपाने ना. पंकजाताई यांच्या मंत्रालयाशी संलग्न कार्यक्रम घेऊन प्रदूषण कमी करणारा उपक्रम राबविला आहे. राजेश गीते म्हणाले की, भाजपाने ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त घेत असलेल्या उपक्रमांमुळे जास्तीत जास्त लोकांपर्यंत जाण्याची कार्यकर्त्यांना संधी मिळते. या संधीचा फायदा घेऊन जनतेचा संपर्क वाढवावा असे आवाहन केले. यावेळी डॉ. शालिनीताई कराड यांनी रक्तदाचे महत्व सांगितले.प्रा. पवन मुंडे म्हणाले की, पंकजाताई मुंडे या राज्यातील मासलिडर आहेत. युवकांसाठी त्या आयडॉल असल्याचेही त्यांनी सांगितले.

## बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके मराठवाडा आयकॉन पुरस्काराने सन्मानित

बीड (सरकार): शासकिय सेवेत कर्तव्यदक्षपणे कार्य करताना सामान्य नागरिकांसह शेतकऱ्यांच्या न्याय हक्काचे निर्णय घेणारे, गैरप्रकार करणाऱ्यांवर तालुका दंडाधिकारी म्हणून कठोर भूमिका घेत कायद्याने कारवाई करणारे, शासकिय सेवेत सतत उत्कृष्ठ कार्य करणारे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या कार्याची दखल घेत नवभारत/नवराष्ट्र तर्फे मराठवाडा आयकॉन पुरस्कार देत त्यांना सन्मानित करण्यात आले.

हा सन्मान सोहळा कार्यक्रम औरंगाबाद येथे हॉटेल रामा इंटर नॅशनल येथे रविवार दिनांक २० जुलै २०२५ रोजी पार पडला. यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, जालना जिल्ह्याचे खासदार डॉ. कल्याण काळे, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या हस्ते तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना मराठवाडा आयकॉन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी नवभारत समूहाचे ग्रुप प्रेसिडेंट ए. श्रीनिवास, सरव्यवस्थापक कल्याण पांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे शिक्षण बी.ए.,डी.एड. झालेले असून त्यांचे मुळ गाव जळगाव जिल्ह्यात आहे. त्यांना विविध विषयांवर लेखनाची आवड असून त्यांचे प्रासंगिक लेख सातत्याने विविध वर्तमानपत्रांमधून प्रकाशित होतात. वैयक्तिक जीवनात सामाजिक, प्रर्यावरण, साहित्य क्षेत्रात त्यांचा सक्रीय सहभाग असतो. ते ०४ ऑगस्ट २००४ रोजी शासकिय सेवेत दाखल झालेले आहे. तेव्हापासून आतापर्यंत त्यांनी गेवराई,



गंगापूर, घनसांगवी, पैठण, अंबड येथे तहसीलदार म्हणून सेवा बजावली आहे. सध्या बीड येथे तहसीलदार म्हणून कार्यरत आहेत.

तहसीलदार शेळके हे बीड तहसील ला रुजू झाल्यापासून त्यांनी सर्वसामान्य जनतेच्या कामांसाठी झोकून देऊन काम करीत आहेत. विशेषतः शिव पानंद रस्ते खुले करून देण्यासाठी ते स्वतः जातीने हजर राहून रस्ते खुले करून देत आहेत. कार्यालयात येणाऱ्या लोकांशी सौजन्याने वागून प्रत्येकाचे प्रश्न समजून घेत ते सोडविण्याच्या दृष्टीने सतत प्रयत्न करत आहेत. यामुळे बीडच्या जनतेला ते आपलेसे वाटतात. सन २०१२-१५ या कालावधीत गेवराईला तहसीलदार असताना तहसीलदार शेळके यांनी नागरिकांचे अनेक प्रश्न मार्गी लावले होते. सुमारे शंभर किलोमीटर रस्ते त्यांच्या कालावधीत झाले होते. त्यामुळे गेवराईचे नागरिक अजूनही त्यांची आठवण काढतात. त्यावेळी जिल्हाधिकारी म्हणून सुनील केंद्रेकर कार्यरत होते. केंद्रेकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अनेक लोकहिताचे उपक्रम राबविले होते. सन २०१४ साली दुष्काळाच्या कालावधीत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल बीडच्या वृत्तपत्रांनी त्यांची दखल घेऊन विशेष बातम्या ही प्रकाशित केल्या होत्या. औरंगाबाद मधील गंगापूर व पैठण येथे तहसीलदार म्हणून कार्यरत असताना विविध निवडणुका शांततापूर्ण पद्धतीने घेणे, संजय गांधी श्रावण बाळ योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देणे, रस्ते काढून देणे यासाठी स्थानिक शेतकरी आजही मोठ्या आपुलकीने व आत्मीयतेने त्यांचे नाव घेतात. सन २०२३ साली अंबड येथे कार्यरत असताना मनोज जरांगे यांचे उपोषण, यावेळी झालेला लाठी हल्ला आणि एकंदरीतच कायदा व सुव्यवस्था याबाबत मोठा प्रश्न निर्माण झाला होता. वरिष्ठांच्या मदतीने ही परिस्थिती कुशलरित्या हाताळल्यामुळे तहसीलदार शेळके यांचा अनुभव अधिकच दुणावला.

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आपल्या मनोगतात असे सांगितले की, मराठवाडा आयकॉन पुरस्कार मिळाल्याने आपली जबाबदारी अधिक वाढते. 'आयकॉन' या शब्दाचा अर्थ मी कोण? असा होतो, त्यामुळे आपण स्वतःची ओळख जाणून समाजासाठी सातत्याने कार्यरत राहणे आवश्यक आहे. हा पुरस्कार केवळ सन्मान नसून इतरांना आणि स्वतःलाही प्रेरणा देणारा आहे.

खासदार डॉ. कल्याण काळे यांनी 'मराठवाड्याचे' मुख्य आकर्षण 'मराठवाडा आयकॉन पुरस्कार वितरण समारंभ', हे ठरले आहे, असे म्हटले. या सोहळ्यात मराठवाड्यातील विविध भागात आणि विविध क्षेत्रात उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रेरणादायी व्यक्ती आणि संस्थांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यकर्त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे समाजात जागृती निर्माण होत आहे आणि सकारात्मक बदल घडत आहेत असे म्हटले. त्यांनी नवभारत समूहाचे कौतुक करताना सांगितले की, नवभारत/नवराष्ट्रने सुरू केलेला हा उपक्रम समाजासाठी अत्यंत चांगला आहे. समाजातील प्रेरणा देणाऱ्या लोकांना पुढे आणणे ही काळाची गरज आहे. तसेच सरकार कुठे चुकते याबाबत परखड भूमिका घेणेही आवश्यक आहे. कारण अशा मतांमुळे समाजाला योग्य दिशा मिळते. नवभारत समूहाचे याबद्दल मनःपूर्वक कौतुक आहे. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले की, नवभारत समूहाचा हा स्तुत्य उपक्रम आहे. समाजात ज्या लोकांनी उल्लेखनीय कार्य केले आहे, त्यांचे कार्य माध्यमांनी पुढे आणणे गरजेचे आहे. बीड तालुक्यातील मसेवाडी, मुळकवाडी येथील वादग्रस्त रस्ता, ढेकणमोह येथील वादग्रस्त शिवरस्ता असो की यासारखे अनेक रस्त्यांचे प्रश्न असो, तहसीलदार शेळके यांनी ते चुटकीसरशी मार्गी लावले, असे तहसीलदार मिळाले तर तालुक्यातील प्रश्न शिल्लकच राहणार नाही. अशी बीडच्या सर्वसामान्य जनतेची भावना या निमित्ताने प्रकर्षाने जाणवली. अशा शासकीय अधिकाऱ्यांचा सन्मान करणे उचितच आहे. यानिमित्ताने त्यांच्या पुढील कार्यास आणि पुढील वाटचालीस भरभरून अभिनंदन करत शुभेच्छा देण्यात आल्या.

## मराठवाडा व्यापारी परिषदेत बीडचा सहभाग

### विविध प्रश्नांवर आवाज उठवत वेधले लक्ष

बीड (सरकार): छत्रपती संभाजीनगर येथे रविवारी मराठवाडा व्यापारी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत बीड जिल्हा व्यापारी महासंघाच्या पदाधिकार्यांसह सदस्यांनी सहभागी होत विविध प्रश्नांवर




आवाज उठवत लक्ष वेधले. यावेळी राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाठ, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांना मागण्यांसंदर्भात निवेदन देत मुख्यमंत्र्यांसोबत संयुक्त बैठक घेण्याची विनंती करण्यात आली.

दि.२० जुलै रोजी च-ड्ख- चे श्रीमती रत्नप्रभा बाळासाहेब पवार सभागृह, चिकलठाणा एमआयडीसी, छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाडा व्यापारी परिषदेचे भव्य आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व उद्घाटक म्हणून महाराष्ट्राचे सामाजीक न्यायमंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाठ तसेच दुग्ध विकास व अपारंपारिक उर्जा मंत्री मा.ना. अतुल सावे हे उपस्थित होते. तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री.मानसिंग पवार व श्री.सत्यनारायण लाहोटी हे उपस्थित होते. अध्यक्ष आदेशपाल छाबढा व त्यांच्या संचालक मंडळाने या सुंदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. बीड जिल्ह्यातून फार मोठ्या प्रमाणात व्यापारी या परिषदेसाठी उपस्थित होते. मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्स या संघटनेला २८ वर्ष पूर्ण झाले याबद्दल तसेच व्यापार्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

## ज्ञानेश्वर माऊली थोरात यांच्या शिवमहापुराण कथेची शुक्रवारपासून शोभायात्रेने होणार सुरूवात

बीड (सरकार): प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पेठ बीड भागातील पौराणिक श्री. रामेश्वर महादेव मंदिर काकू-नाना मळा येथे श्रावणमास निमित्ताने शिवपुराण कथेचे



आयोजन करण्यात आले असून शुक्रवार दि.२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वा. बालाजी मंदिर मोंढा रोड येथून भव्यदिव्य शोभायात्रा काढण्यात येणार असून श्री. ज्ञानेश्वर माऊली थोरात जालनेकर यांच्या अमृतवाणीतून संगीतमय शिवमहापुराण कथेस प्रारंभ होत आहे.

या कथेचा प्रारंभ शुक्रवार दि. २५ जुलै ते गुरुवार दि. ३१ जुलै २०२५ दरम्यान दुपारी एक ते चार या वेळेत श्री. ज्ञानेश्वर माऊली थोरात जालनेकर यांच्या अमृतवाणीतून संगीतमय शिवमहापुराण कथा संपन्न होत आहे तसेच कथेची सांगता गुरुवार दि. ३१ जुलै २०२५ रोजी होत असून कथा सांगतेची वेळ दहा ते एक असून शिवमहापुराण कथा ज्ञानयज्ञास परिसरातील महिला, पुरुष भाविकभक्तांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन पंचक्रोशीतील सर्व शिवभक्त, जय श्रीराम गणेश मित्र मंडळ पेठ बीडच्या वतीने करण्यात आले आहे.

## महावितरणचे पाटोदा बे.परिसरातील लाईनमन मयूर राऊत यांचा सत्कार



बीड (सरकार): तालुक्यातील आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचालित पाटोदा बे. माध्यमिक विद्यालयात मंगळवारी महावितरणचे पाटोदा बे.परिसरातील लाईनमन मयूर राऊत यांचा पाटोदा बे. मी आई ध्सयमिक विद्यालयात प्राचार्य तथा मुख्याध्यापक धनवंत मस्के सर यांच्या हस्ते सत्कार संपन्न झाला.

या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना मयुर राऊत म्हणाले की मी पाली ता. जि. बीड येथील रहिवासी असून महावितरणमध्ये कार्यरत आहे. येथे येण्या आधी माझ्याकडे लिंबा रुई, मुर्शदपुर व शहाजनपूर येथील चार्ज होता व आता पाटोदा बेलखंडी, कचरवाडी, दत्तनगर, नागझरी, मानेचावाडा येथील कार्यभार देण्यात आला आहे. राजुरी शाखा मध्ये दोन ते अडीच वर्षापासून कार्यरत आहे असे सांगून त्यांनी याभागातील विद्युत ग्राहकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहील अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी धनवंत मस्के मुख्याध्यापक, भागवत खोसे, जालिंदर कारवटे, रघुनाथ गदळे, नवनाथ गायकवाड, सुभाष डावे, रामेश्वर काशीद आदींसह शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी पालक ग्रामस्थांनी शुभेच्छा दिल्या तसेच यावेळी परिसरातील ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## शिष्यवृत्ती परीक्षेत माईलस्टोनच्या सात विद्यार्थ्यांचे यश

बीड (सरकार): माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल, दत्तनगर तळेगाव येथील विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप परीक्षेत उत्तम कामगिरी करत शाळेचे नाव उज्वल केले आहे. इयत्ता ५ वीतील १० विद्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग घेतला होता. त्यापैकी तब्बल सात विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून अनुष्का भिसे शिष्यवृत्ती मिळवण्यासाठी पात्र ठरली आहे.

स्कॉलरशिप परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थीमध्ये अनुष्का भिसे, आयुषी कुलकर्णी, रुद्र मोहिते, आरोही कदम, चैतन्य काकडे, शौर्य मस्के आणि यश बनसोडे. यापैकी अनुष्का भिसे हिने उल्लेखनीय कामगिरी करत शिष्यवृत्ती पात्रता मिळवली आहे. संचालक ज्ञानेश्वर तांबे यांच्या हस्ते अनुष्का भिसे हीचा सत्कार करण्यात आला. यावेळी ज्ञानेश्वर तांबे म्हणाले की, आमच्या शाळेचा उद्देश केवळ पुस्तकी ज्ञान मर्यादित न ठेवता, विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी सज्ज करणे हाच आहे, या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले. अनुष्का भिसे सह इतर विद्यार्थ्यांचे अभिनंदन संचालक नम्रता तांबे, प्रिन्सिपल सारिका जगताप, शिक्षक अमोल क्षीरसागर, सत्यजित ठाकूर शिक्षिका माधुरी तांबे, अर्चना जोगदंड, स्वाती भांडवलकर, सुषमा पवार, अर्चना गोरे, जयश्री राऊत व पालकांनी केले.

## समाजाच्या सर्वांगीन विकासासाठी शासन कटीबद्ध-राज्यमंत्री नाईक

### गोर बंजारा समाजाच्या एकता मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड (सरकार): राज्यातील सर्व समाजाच्या सर्वांगीन विकासासाठी शासन कटीबद्ध आहे. बंजारा समाजाचे देखील विविध प्रश्न आहेत, ते सोडविण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचे प्रतिपादन उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी केले.

गेवराई येथील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त गोर बंजारा समाजाच्यावतीने आयोजित एकता मेळाव्यात ते बोलत होते. याप्रसंगी आमदार विजयसिंह पंडित, मुख्यमंत्री सहायता निधीचे प्रमुख रामेश्वर नाईक, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे सहआयुक्त विजय राठोड, साहेबराव शास्त्री महाराज, सचिन महाराज, चैतन्य महाराज, अमरसिंह पंडित, नाईक फाऊंडेशनच्या ङमोहिनीताई इंद्रनील नाईक, उत्तम चव्हाण, प्रा. पी.टी.चव्हाण, बाबुराव जाधव, अण्णासाहेब राठोड, राजेश पवार, सतीश पवार, अनिल राठोड आदींची उपसिवती होती.

राज्यस्तरीय बंजारा भूषण पुरस्कार समस्त गोर समाजाच्या वतीने देऊन राज्यमंत्री नाईक यांना सन्मानित करण्यात आले. यासह राज्य लोकसेवा आयोग, दहावी, बारावी, अभियांत्रिकी आदी क्षेत्रात प्राविण्य मिळवणाऱ्या गुणवंतांचा राज्यमंत्री नाईक यांच्याहस्ते सन्मान करण्यात आला. अमरसिंह पंडित, उत्तम चव्हाण, पी.टी.चव्हाण, रामेश्वर नाईक, साहेबराव शास्त्री, ॲड.मोहिनी नाईक यांनी विचार मांडले.

सुरूवातीला माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. प्रास्ताविक उत्तम चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन राहुल गिरी यांनी केले. गेवराई एमआयडीसीसंदर्भातील बैठक लवकरच गेवराई एमआयडीसीसंदर्भातील बैठक लवकरच घेण्याबाबत पुढाकार घेण्यात येईल,

अशी ग्वाही उद्योग राज्यमंत्री नाईक यांनी यावेळी दिली. यासह गावतांड्यावर शासनाच्या विविध कल्याणकारी योजना पोहोचविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे, असेही त्यांनी सांगितले.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)